**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. ११०/२०११ दि.२९.११.२०११**

| | | |
|---|---|---|
| **श्री. तुकाराम धर्माजी गोटम व,<br>श्री.विनय तुकाराम गोटम<br>मु.हातिवले, ता.राजापूर,<br>जि.रत्नागिरी.** | } | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता 'महावितरण'<br>स व सु विभाग रत्नागिरी** | } | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | } | **१) श्री. व्ही.बी.जगताप<br>अध्यक्ष, कार्यकारी अभियंता / सचिव<br>२) श्री.एन्.ए.कुलकर्णी , सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | } | **अनुपस्थित** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | } | **श्री.अनिल वा.महाजन (कार्यकारी अभियंता)<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी<br>श्री.अजित अ.कागी (उपकार्यकारी अभियंता)<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

अर्जदार तुकाराम धर्माजी गोटम व विनय तुकाराम गोटम, गोटमवाडी, मु.हातिवले, पो.कोंडये, ता.राजापूर,जि.रत्नागिरी यांची तक्रार अनुसुची 'अ' मध्ये आवश्यक त्या तपशिलासह दि.२९.११.२०११ रोजी दाखल झालेली आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्र.११०४, दि.०७.१२.२०११ च्या पत्रानुसार विभागीय कार्यालय रत्नागिरी यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले असता, विभागीय कार्यालयाकडून पत्र क्र.७४३९, दि.२९.१२.२०११ च्या पत्रानुसार आवश्यक त्या कागदपत्रासह तपशिल दाखल झाल्यानंतर तक्रार प्रकरणाची सुनावणी दि.३०.१२.२०११ रोजी घेण्यात आली असता, ग्राहकाच्यावतीने ई-मेल पाठविण्यात येवून आत्तापर्यंत दाखल केलेल्या कागदपत्राच्या आधारे निर्णय घेण्यात यावा असे कळविण्यात आले आणि महावितरणच्यावतीने कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता , विभागीय कार्यालय यांनी उपस्थित राहून आपला युक्तीवाद सादर केला.

अर्जदाराच्या तक्रारीचे स्वरुप असे की, अनंत गोटम यांनी बोअरवेल लावलेले विद्युत मोटारीचे कनेक्शन बेकायदेशीर असून ते खंडीत करण्यात येवून विजपुरवठा थांबविण्यात यावा. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार तक्रार प्रकरणातील बोअरवेलचे काम अनंत गोटम यांनी दि.२१.०१.२०११ रोजी पुर्ण केले असून घर क्रं.३४५ वरिल बांधकामही बेकायदेशीर आहे. त्यामुळे बेकायदेशीर बांधलेल्या घर क्रं.३४५ चा विद्युत पुरवठा खंडीत करणे, मिटर क्र.७६११५०३८३४ व ग्राहक क्र.२१४६४०००२१७४ रद्द करणे बाबत संबंधितांना कळविले आहे. अनधिकृत बोअरवेल आणि बेकायदेशीर घर क्र.३४५ या भिन्न बाबी असून वेगवेगळया कायद्याखालील तरतुदींचे उल्लंघन झालेले आहे. मुळातच बोअरवेल बेकायदेशीर असल्याने तसेच बांधकामही बेकायदेशीर असल्याने विद्युतपुरवठा करणे चुकीचा असल्याने तो सुरु ठेवण्यात आलेला असून महावितरणला वेगवेगळया कायद्यातील उल्लंघनाच्या बाबी स्पष्ट करुनही कार्यवाही करण्यात आलेली नाही. आयोगाच्या नियमावलीनुसार अर्जदाराची तक्रार परिशिष्ठ 'क्ष' मध्ये अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांच्याकडे दि.१७.०८.२०११ रोजी दाखल केली असता, कक्षाकडील पत्र क्र.५६२२, दि.३०.१०.२०११ च्या पत्रानुसार उत्तर पाठविण्यात येवून मंचाकडे तक्रार दाखल करण्याविषयी कळविण्यात आले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार विज अधिनियम २००३ च्या कलम १४९,१५०,१४६ व १४२ अंतर्गत कारवाई होणे गरजेचे आहे. विजजोडणी देताना सहहिस्सेदाराचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे गरजेचे होते, तथापी सर्व नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृत बोअरवेलच्या अतिरिक्त लोड अर्जालाही संमत्ती देण्यात आलेली आहे. विज विधेयक कायद्यातील तरतुदी आणि आयोगाच्या नियमावलीचा विचार कलम १७५ आणि नियमावलीच्या ५.८ या अंतर्गत आपणास असलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर बेकायदेशीर बोअरवेलवर लावलेल्या विद्युत मोटार पंपाची वीज खंडीत करण्याचा आदेश देण्यात यावा. अर्जदाराने आपल्या लेखी युक्तीवादासोबत आवश्यक ती कागदपत्रे आणि तपशिल दाखल केला असून, त्याच्या आधारे न्याय मिळण्याची विनंती केलेली आहे.

या तक्रारप्रकरणाची सुनावणी दि.३०.१२.२०११ रोजी घेण्यात आली असता, अर्जदाराकडून २९ तारखेला ई-मेल पाठविण्यात येवून, दाखल झालेला युक्तीवाद व आजपर्यंत दाखल करण्यात आलेल्या कागदपत्राच्या आधारे निर्णय घेण्यात यावा असे कळविण्यात आले. महावितरणच्यावतीने कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय रत्नागिरी यांनी उपस्थित राहून युक्तीवाद केला. महावितरणने आपल्या युक्तीवादात स्पष्ट केले की, अर्जदाराने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार करताना विनय तुकाराम गोटम हे एकटेच होते आणि मंचाकडे तक्रार दाखल करताना तुकाराम धर्माजी गोटम

यानांही सहअर्जदार केले असल्यामुळे विज नियामक आयोगाच्या कलम ६.२ आणि ६.७ चा भंग होत असून, यातील तरतुदीनुसारच अर्जदाराला संबंधित तक्रारीबाबत ग्राहक या नात्याने तक्रार दाखल करताच येत नाही. विद्युत कायदा २००३ (कलम २) उपकलम १५ च्या ग्राहक व्याख्येनुसार सदरहू विजजोडणीबाबत अर्जदार विनय तुकाराम गोटम किंवा त्यांचे वडिल तुकाराम धर्माजी गोटम यांचे नाव नाही. अनंत गंगाराम गोटम यांच्या घर नं.३४५ मध्ये विजजोडणी असून, ग्राहक क्र.२१४६४०००२१७४ असा आहे. गट क्र.१५३ सामाईक असून त्यामध्ये अनंत गंगाराम गोटम हे सहहिस्सेदार आहेत. मिळकत क्र.३४५ म्हणजेच जुने घर क्र.२५१ येथील विजकनेक्शन आणि मालकी हक्क अनंत गोटम यांचा असून अन्य कोणत्याही व्यक्तीला ग्राहक या नात्याने तक्रार किंवा हरकत करता येत नाही. ग्राहक सज्ञेत संबंधित अर्जदार येत नाहीत. तक्रार प्रकरणातील विद्युत कनेक्शन ग्राहकाच्या नावे असून बोअरवेलकरिता स्वतंत्र जोडणी देण्यात आलेली नाही. बोअरवेल अधिकृत किंवा अनधिकृत करण्याचे अधिकार संबंधित खात्याला आहेत. अनंत गंगाराम गोटम यांना घर न.३४५ येथे घरघुती विजजोडणी दि.१८.०२.२००५ रोजी देण्यात आली असून, सदरहू जोडणी देताना सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करण्यात आलेली आहे. सदरहू ग्राहकाने याच जोडणीवर सिंगल फेज १ अश्वशक्तीच्या सबमर्सिबल बोअरवेलवर स्वतःच्या पिण्याच्या पाण्याच्या वापरासाठी ज्यादा विजभाराची मागणी फेब्रुवारी २०११ मध्ये केली असताना आवश्यक त्या नियामांची पुर्तता केल्यानंतरच ज्यादा विजभार सुरु केलेला आहे. याकरिता स्वतंत्र विजजोडणी देण्यात आलेली नाही. बोअरवेल विजजोडणी हा मुळातच विषय नसल्याने आणि बोअरवेलकरिता स्वतंत्र विजजोडणी नसल्याने विजजोडणी खंडीत करण्याचा किंवा बोअरवेल अनधिकृत ठरवण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. प्राप्त माहितीनुसार जुना घर क्र.२५१ आणि नविन घर क्र.३४५ या मिळकतीबाबत हिस्सेदारांच्या मधील वाद न्यायप्रविष्ठ असल्याचे अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडील 'क्ष' फार्ममधील मुद्दा क्र.१० मध्ये नमुद केलेले आहे कि ज्याचा महावितरणशी कोणताही संबंध नाही. तक्रार प्रकरणातील वस्तुस्थिती पाहता आणि कायद्यातील तरतुदींचा विचार करता कोणत्याही अटींची पुर्तता तसेच नियमावली सदर प्रकरणास लागू होत नसल्याने तक्रार फेटाळण्यात यावी.

महावितरणच्या या युक्तीवादास अर्जदाराकडून तपशीलवार म्हणणे तसेच राजापूर येथिल मे.सिव्हिल जज्ज सा़ो यांचे कोर्टातील रे.मु.नं.५३/२००९ ची प्रत देण्यात आली असून गाव नमुना ८-अ तसेच उपविभागीय अधिकारी, रत्नागिरी उपविभाग यांचेकडील आदेश दि.१७.१२.२०११ दाखल झाला असून त्यानुसार स्वतंत्र खुलासाही करण्यात आलेला आहे.

तक्रार प्रकरणातील उभयबाजुंनी केलेला युक्तीवाद, दाखल करण्यात आलेली कागदपत्रे व संबंधित तपशिल याची सखोल शहानिशा केली असता, अर्जदार विनय तुकाराम गोटम आणि सहहिस्सेदार तुकाराम धर्माजी गोटम हे कायद्यातील तरतुदीनुसार 'ग्राहक' या सज्ञेस पात्र नाहीत असे मंचाचे स्पष्ट मत आहे. विज विधेयक २००३ मधील कलम २ आणि उपकलम १५ नुसार करण्यात आलेली व्याख्या या तक्रार प्रकरणास लागू होत नाही. त्याचप्रमाणे नियामक आयोगाच्या नियमावलीनुसार २.१ मधील उपकलम 'C' मध्ये 'Grievances' म्हणजे नेमके काय ही बाब स्पष्ट असून या संज्ञेतही अर्जदाराची तक्रार समाविष्ठ होवू शकत नाही. 'ग्राहक' आणि 'तक्रार' यांचा एकत्रित विचार केल्यास कायद्याला अभिप्रेत असलेल्या व्यक्ती तसेच तक्रारीचे स्वरुप स्पष्ट होत नसल्याने बोअरवेल अधिकृत किंवा अनधिकृत हा प्रश्न उपस्थित होवू शकत नाही. महावितरणकडून दाखल झालेल्या कागदपत्रावरुन २००५ साली देण्यात आलेली घरघुती विजजोडणी नियमानुसार असून २०११ मध्ये देण्यात आलेला अतिरिक्त भारही नियमास धरुनच आहे. बोअरवेलकरता कोणतीही स्वतंत्र विजजोडणी देण्यात आलेली नाही ही वस्तुस्थिती मंचासमोर असून, अन्य कायद्यातील तरतुदींचा उहापोह याकरिता करणे हा मंचाच्या अखत्यारी बाहेरिल विषय असून यावर कोणतेही भाष्य करणे मंचाला उचीत वाटत नाही. विधेयकातील तरतुदी तसेच नियमावली विचारात घेता ग्राहक हिताला व्यापक

प्राधान्य देण्यात आलेले आहे. पण त्याकरिता ग्राहक या नात्याने काही शर्ती आणि अटींची पुर्तता करणे संबंधित अर्जदार, तक्रारदार आणि ग्राहक यांना बंधनकारक आहे. तक्रार प्रकरणातील संबंधितांचे 'Intention' तपासणे तितकेच महत्वाचे असून कायद्याच्या तरतुदीतील कसोटींना ते उतरणे ही तितकेच महत्वाचे आहे. संबंधित तक्रार प्रकरणातील वस्तुस्थिती पाहता एखाद्या वेगळया उद्देशाने तक्रार केल्याचे स्पष्ट झाले आहे आणि त्यामुळेच अशी तक्रार फेटाळणे कायद्यातील तरतुदीशी सुसंगत ठरणारे आहे. तक्रारदाराने उपस्थित केलेले आक्षेप आणि हरकती या संबंधित तक्रारीला लागू होत नसून केवळ एका विशिष्ट हेतूने महावितरणला जबाबदार धरणे म्हणजेच वस्तुस्थितीचा विपर्यास्त होय आणि त्यामुळेच सदरहु आक्षेप / हरकती प्रकरणाला लागू होत नसल्याने त्या फेटाळण्यात येत आहेत.

मंचाच्या या निष्कार्षानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

**१. तक्रारदार तुकाराम धर्माजी गोटम व विनय तुकाराम गोटम यांनी उपस्थित केलेल्या हरकती / आक्षेप वस्तुस्थितीशी विसंगत असल्याने त्या फेटाळण्यात येत असून, अर्जदारांची तक्रार अमान्य करण्यात आलेली आहे.**

**२. खर्च किंवा अनुषंगिक बाबीसाठी कोणताही आदेश नाही.**

**३. या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :-**

**सचिव,**
**लोकपाल महाराष्ट्र राज्य विदयुत नियामक आयोग**
**६०६/६०८, केशवा बिल्डींग,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२ / २६५९२९६५**

**व्हि.बी.जगताप**
**अध्यक्ष, कार्यकारी अभियंता/सचिव**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**एन्.ए.कुलकर्णी**
**सदस्य**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- १८.०१.२०१२**
**ठिकाण :- रत्नागिरी.**